महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १९२ वा | दिनांक : २०/०५/२०२५ | वार : मंगळवार

## सरन्यायाधीश आंबेडकरी विचारांचे असल्याने अपमान केला का? : नाना पटोले



**मुंबई** : महाराष्ट्राचे सुपुत्र भूषण गवई सरन्यायाधीश झाल्याने अख्या महाराष्ट्राला त्यांचा अभिमान आहे पण आपल्याच सुपुत्राचा अपमान राज्यातील भाजपा युती सरकार व अधिकाऱ्यांनी केला आहे.

सरन्याधीशांसाठी असलेला प्रोटोकॉल न पाळून त्यांचा अपमान केला. हे देश व राज्याला सहन न होणारे आहे, सरन्यायाधीशांचा प्रोटोकॉल न पाळून अपमान करणाऱ्या अधिकाऱ्यांवर सरकार काय कारवाई करणार आहे? असा प्रश्न काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनी विचारला आहे.

यासंदर्भात प्रसारमाध्यमांशी बोलताना नाना पटोले म्हणाले की, राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान, लोकसभेचे अध्यक्ष सरन्यायाधीश, यांचा एक विशेष प्रोटोकॉल असतो, त्यांच्या दौऱ्याची माहिती आधिच दिलेली असते पण आम्हाला माहिती नव्हती असे अधिकारी सांगत आहेत हे पटणारे नाही. सरन्यायाधीशांचा प्रोटोकॉल न पाळून भाजप युती सरकारने महाराष्ट्राची अब्रु वेशीवर टांगली आहे. सरन्यायाधीश त्यावर गमतीने बोलले, पण तो प्रशासनाला इशारा आहे तो सरकारला कळला नसेल. सरन्यायाधीश गवई हे आंबेडकरी आहेत म्हणून त्यांच्या महाराष्ट्रात अपमान केला आहे का? का मुख्यमंत्र्यांनी तसे आदेश दिले होते? हे समजले पाहिजे. शिव, शाहू, फुले आंबेडकरांच्या राज्यातून एक आंबेडकरी विचाराचा व्यक्ती सरन्यायाधीश झाला त्याचा आनंद आहे. विशेष म्हणजे सरकारमध्ये अनुभवी मुख्यमंत्री व दोन उपमुख्यमंत्री आहेत त्यांनाही याचे गांभीर्य नाही का? असेही नाना पटोले म्हणाले.

राज्य सरकार सर्वधर्म समभाव मानत असेल तर महान समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनावरील फुले चित्रपट राज्यात टॅक्स फ्री करावा अशी मागणीही नाना पटोले यांनी केली. या आधी सरकारने राज्यात अनेक चित्रपट टॅक्स फ्री केले आहेत पण फुले यांच्या जीवनावरील चित्रपटाबाबत वेगळी भूमिका का? असा सवाल नाना पटोले यांनी उपस्थित केला.

## 'वन नेशन, वन इलेक्शन'मुळे हुकूमशाहीचा धोका : अंबादास दानवे



**मुंबई** : एकाचवेळी संपूर्ण देशात निवडणुका घेण्याच्या केंद्र सरकारच्या "वन नेशन, वन इलेक्शन" या प्रस्तावावर विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी तीव्र आक्षेप नोंदवला आहे. या धोरणामुळे केंद्रात एका पक्षाची हुकूमशाही निर्माण होईल, अशी गंभीर चिंता त्यांनी व्यक्त केली आहे. एकत्रित निवडणुका घेतल्यास स्थानिक मुद्द्यांचा आवाज राष्ट्रीय प्रचारात हरवण्याची शक्यता आहे. असेही अंबादास दानवे म्हणाले. याबाबत त्यांनी एक राष्ट्र, एक निवडणूक संयुक्त समितीकडे त्यांनी हरकती नोंदवत काही महत्त्वाच्या सुधारणा सुचवल्या आहेत.

'वन नेशन, वन इलेक्शन'चा एवढा पुळका आहे, तर मागच्या काळात हरियाणा आणि झारखंडच्या निवडणुका झाल्या, तेव्हा महाराष्ट्राच्याही निवडणुका होऊ शकत होत्या. परंतु केंद्राच्या निवडणूक आयोगाने महाराष्ट्र आणि झारखंड-हरियाणाच्या निवडणुका वेगळ्या घेतल्या होत्या, असे अंबादास दानवे म्हणाले.

लोकसभेच्या निवडणुकीवेळी महाराष्ट्रात मतदान केंद्रावर प्राथमिक सुविधांचा अभाव होता. बुथचे व्यवस्थापन व्यवस्थित होऊ शकले नाही. रात्री २ वाजेपर्यंत मतदान चालल्याचे निवडणूक आयोग म्हणते. सायंकाळी पाचवाजेनंतर सुद्धा लाखो मतदार झाले, याचा अर्थ निवणूक यंत्रणा सुस्थितीत नव्हती, असे दानवे यांनी सांगितले.

जिल्हा परिषद व महानगर पालिका निवडणुका एका फेजमध्ये घेऊ शकत नसल्याचे महाराष्ट्र निवडणूक आयोगाने नुकतेच न्यायालयाला सांगितले. महाराष्ट्रसारख्या पुढारलेल्या राज्याने अशाप्रकारे मत मांडले यावरून वन नेशन वन इलेक्शनची स्थिती काय आहे? ते स्पष्ट होत असल्याचे दानवे म्हणाले.

आपला भारत देश हा विविधितेतून नटलेला आहे. महाराष्ट्राची वेगळी अस्मिता, प्रतिमा आहे. इतर राज्येही तशीच आहेत. अनेक प्रादेशिक पक्ष त्या-त्या राज्यातील प्रादेशिक अस्मिता घेऊन काम करतात. वन नेशन वन इलेक्शनची सक्ती केल्यास प्रादेशिक अस्मिता किंवा प्रादेशिक स्वाभिमान याचा नायनाट होऊ शकतो. केंद्रात एका पक्षाचे सरकार येऊन ते हुकूमशाही करून प्रादेशिक वातावरण मोठ्या प्रमाणात बिघडवू शकते, अशी भीती अंबादास दानवे यांनी व्यक्त केली.

## शेतकऱ्यांना कर्ज देताना सिबिल मागू नका : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**मुंबई** : शेतकऱ्यांना कर्ज देताना त्यांच्याकडे सिबिलची मागणी करणाऱ्या बँकांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चांगलेच खडसावले आहे. शेतकऱ्यांना कर्जाचे वाटप करताना त्यांच्याकडे सिबिलची विचारणा करू नका. राज्य व शेतकऱ्यांच्या सर्वसमावेशक विकासासाठी बँकांनी राज्य सरकारशी समन्वय साधून काम केले पाहिजे, असे ते या प्रकरणी बँकांना खडसावत म्हणाले.

मुंबईत सोमवारी राज्यस्तरीय बँकर्स समितीची बैठक पार पडली. या बैठकीत बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आयसीआयसीआय, एचडीएफसी व ॲक्सिस या खासगी क्षेत्रातील प्रमुख बँकांना चांगलेच खडेबोल सुनावले. ते म्हणाले, बँकांनी शेतकऱ्यांना कर्ज देताना त्यांच्याकडे सिबिलची मागणी करू नये. रिझर्व्ह बँकेचे तसे आदेश आहेत. पण त्यानंतरही शेतकऱ्यांना सिबिल मागितले जाते. त्यामुळे आम्ही अशा बँकांवर एफआयआर दाखल केला आहे. तुम्हाला हे गांभिर्याने घ्यावेच लागेल. पर्यायी तोडगा काढावाच लागेल.

यंदा राज्यात दुष्काळी परिस्थिती नाही. चांगले पीक-पाणी येण्याचे संकेत आहेत. त्यामुळे बँकांनीही शेतकऱ्यांना अधिक सहकार्य करण्याची भूमिका घेतली पाहिजे. महाराष्ट्रात एफपीओ मोठ्या संख्येने आहेत. महाराष्ट्रात MSMEs ही मोठ्या प्रमाणात आहेत. राज्यात गुंतवणुकीचा ओघही चांगला आहे. राज्य स्टार्टअपची राजधानी होण्याच्या मार्गावर आहे. दावोसमधूनही १६ लाख कोटींची गुंतवणूक महाराष्ट्रात येणार आहे. त्यामुळे बँकांनी या गोष्टीकडे लक्ष दिले तर रोजगार निर्मिती मोठ्या प्रमाणात होईल, असे फडणवीस म्हणाले.

ते पुढे म्हणाले, बँकांनी आपले प्राधान्यक्रम सरकारच्या सोबतीने ठरवले तर समग्र विकास होण्यास मदत होईल. केंद्र व राज्य सरकारच्या योजना अंमलात आणणे ही बँकांचीही जबाबदारी आहे. त्यातून आर्थिक सर्वसमावेशकता साधली जाईल. त्यासाठी सरकार व बँका यांची एकत्र जबाबदारी आहे. गडचिरोलीत उद्योगधंद्यांचे जाळे तयार होत आहे. त्यामुळे तिकडेही लक्ष केंद्रीत करण्याची गरज आहे. बँकांनी शेतकऱ्यांसाठी व त्यांच्यासाठी तयार करण्यात येणाऱ्या योजनांमध्ये चांगले काम करणाऱ्यांचा सन्मान केला पाहिजे. जे चांगले काम करत नाहीत, त्यांची नावे घ्या. त्यांच्यावर पुढच्या बैठकीत कारवाई करा, अशी सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली.

उल्लेखनीय बाब म्हणजे बँका व वित्त पुरवठा करणाऱ्या कंपन्या शेतकऱ्यांना कृषि कर्ज देताना सिबिल स्कोअरची अट घालतात. त्यामुळे शेतकऱ्यांना नाईलाजाने खासगी सावकाराकडे धाव घ्यावी लागते. त्यातून त्याला आर्थिक शोषणाला सामोरे जावे लागते. रिझर्व्ह बँकेने यापूर्वीच शेतकऱ्यांसाठी सिबिलची अट नसल्याचे स्पष्ट केले आहे. पण त्यानंतरही बँकांकडून त्याची मागणी केली जाते. विशेषतः राज्य सरकारने वेळोवेळी बँकांना असे न करण्याची तंबी दिल्यानंतरही बँकांचे व्यवस्थापन शेतकऱ्यांकडे सिबिलची मागणी करते. त्यामुळे शेतकरी वर्गातून मोठ्या प्रमाणात संताप व्यक्त केला जातो.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २० मे २०२५


## कन्नड शहरात भव्य तिरंगा रॅली संपन्न



**कन्नड (स्वप्निल राठोड):** पाकिस्तानातील दहशतवाद्यांनी २२ एप्रिल रोजी पेहेलगाम येथे केलेल्या हल्ल्यानंतर भारतीय सैन्यांनी दिनांक ७ मे रोजी दिलेल्या चोख उत्तर देऊन पाकिस्तानचे कंबरडे मोडले यात भारतीय सैन्याने जगाला आपली अतुलनिय शक्ती दाखवली या विजयाच्या समर्थनार्थ व त्यांचे मनोबल उंचावण्यासाठी भारतात ठीक ठिकाणी देश भरात तिरंगा रॅली काढण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे आज १८ मे रोजी कन्नड येथे भव्य तिरंगा रॅली काढण्यात आलीया तिरंगा रॅलीची सुरुवात कॉलेज रोड गिरणी ग्राउंड येथून झाली शहरातील विविध पक्षांचे जाती धर्माचे राष्ट्र प्रेमी नागरिक यात सामील झाले ही रॅली पिशोर नाका येथे पोहोचल्यानंतर राष्ट्रगीत झाले ठीक ठिकाणी लोकांनी या रॅलीचे स्वागत केले पुढे साठे चौक मार्ग ही रॅली शिवाजी महाराज उद्यान येथे पोहोचली या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांना पुष्पहार वाहण्यात आला.

या समारोपात माझी सैनिक संतोष गुरुकुल यांनी सर्वांना संबोधित केले या भाषणात त्याने स्वतःचे तीन युद्धाचे अनुभव सांगितले व युद्धात भारतीय सैन्याने कोणती गौरवास्पद कामगिरी केली याचा उल्लेख केला, त्यानंतर सचिन महाराज तेलवाडी यांनी आपल्या भाषणात भारतीय सैन्याबद्दल गौरव उद्गार काढले त्यानंतर पण पेलगाम येथील पर्यटक व शहीद भारतीय सैन्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

याप्रसंगी उपस्थितशेखर मांडे ,विजय वाणी, कैलास जाधव,सुभाष आबा काळे सुनील पवार, राजेंद्र गव्हाणे, निलेश थोरात, प्रवीण अहिरे ,निखिल अग्रवाल, मयूर राठोड , विलास भोजने, बाळू निकम, स्वप्नील श्रीकांत ,बापू कुलकर्णी, श्रीकांत जोशी, हारदे बापू, रेणुकादास कुलकर्णी ,हेमंत शिंपी, गौरव जडे ,विकास बरडे ,किरण गरुड, सुशांत पवार ,कार्तिक हारदे सुदाम पवार, कल्पेश वाणी

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलची १०९ वी शतकोत्तर वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न



**छत्रपती संभाजी नगर :** फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जनसंपर्क कार्यालय, ४, साकेत नगर, छत्रपती संभाजी नगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर ११ मे १९४१ ला मुंबई येथे म्हणाले होते की, श्वान वृत्ती सोडून मनुष्यत्वाची धारणा करा. या विधानाच्या ८४ व्या वर्धापनानिमित्त १०९ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा ११ मे २०२५ ला संपन्न झाली.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे समन्वयक इंजिनिअर किशोर पाटील अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, केवळ मागण्याची प्रवृत्ती जोपासने हे कुत्र्याचे जीवन आहे. ते नाकारून आपण मनुष्यत्वाची धारणा केली पाहिजे. वर्तमानपत्र चालविण्याच्या अनुषंगाने खंत व्यक्त करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर विपरीत परिस्थितीत सुद्धा जनता हे पत्र चालविण्यावर ठाम होते. कारण तेच एकमेव प्रसार माध्यमांचे साधन होते. ज्यातून जनतेपर्यंत संदेश पोहचवला जात होता.

उद्घाटनपर मार्गदर्शन करताना प्रतीक पंचशील म्हणाले की, आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनुयायी म्हणून त्यांनी दिलेल्या सर्व आदेशाचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे.

प्रमुख वक्ते म्हणून बोलताना फुले शाहू आंबेडकराईट विचारांचे प्राध्यापक ग. ह. राठोड म्हणाले की, आता समाजात आर्थिक सक्षम लोक निर्माण होत असल्याने त्यांनी स्वत:मध्ये दान वृत्ती विकसित करून संस्थाने, प्रतिष्ठाने स्वबळावर चालविली पाहिजेत. आपण आपल्या समाजाला सढळहस्ते मदत केल्यास विकास व्हायला वेळ लागणार नाही. चौथ्या वर्गात शिकत असताना गुलामगिरी हे पुस्तक वाचनात आल्याने मनुवाद्यांच्या विरोधात भूमिका घ्यायला सुरुवात केली होती. १९९८ पर्यंत नरेंद्र दाभोळकरांबरोबर अंधश्रद्धा निर्मूलनासह समाजजागृतीचे काम केले आहे. तेव्हा पासून फुले शाहू आंबेडकराईट विचारांचे कार्य सुरू आहे. डॉ. अशोक गायकवाड यांच्या प्रकाशनाच्या माध्यमातून ३० पुस्तके प्रकाशित केली आहेत. अशाप्रकारे प्रबोधनाचे कार्य सर्व स्तरावर सुरू आहे.

याप्रसंगी महादेव डांबरे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना इमारत बांधत असताना तत्कालीन परिस्थितीत युद्धजन्य परिस्थितीमुळे अडीच लाखाचे बजेट चार लाख रुपये झाले तेव्हा सेवासदन संस्थेचा आदर्श घेऊन आपण वाढीव फंड निर्माण केला पाहिजे असे म्हणाले होते. तसेच काँग्रेसमध्ये जाऊन चार लाख काय दहा मिळविता येतील परंतु ही श्वान वृत्ती आहे. त्याची जोपासना करता येणार नाही. काळानुसार परिस्थिती बदलत असते याचे भान ठेवून आता आपण खेड्यापाड्यात तांड्यावर जाऊन बुद्ध फुले शाहू आंबेडकर पेरियारासह सर्व महापुरुषांचे परिवर्तनवादी विचार समजावून सांगितले पाहिजे. प्रास्ताविकात उद्योजक मिलिंद बागूल म्हणाले समाजात चळवळी विषयी फार अनास्था पहायला मिळत आहे. वर्तमानातील पत्रकारितेला समाजाच्या सुखदु:खाशी काही देणे घेणे उरलेले नाही.

सुत्रसंचालन महादेव डांबरे यांनी केले. सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करण्यात आल्या तर स्टडी सर्कलच्या वतीने उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. या कार्यशाळेला प्रतीक पंचशील, इंजिनिअर किशोर पाटील, प्राध्यापक ग. ह. राठोड, उद्योजक मिलिंद बागूल, संग्राम घाटे, जयपाल सिंह राठोड इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने कार्यशाळा हर्षोल्हासात संपन्न झाली.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २० मे २०२५

## अवैध देशी / विदेशी दारु वाहतुकीवर धडक कार्यावाही १० लाख रुपयाचा चा मुद्देमाल जप्त




**वाशिम (महेश मुंढे)** : दिनांक १७/०५/२०२५ रोजी मा. नवदीप अग्रवाल (भा.पो.से.) सहाय्यक पोलीस अधीक्षक उपविभाग वाशिम चार्ज मंगरुळपीर यांचे मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी वाशिम व मंगरुळपीर येथील कार्यालयीन स्टॉफसह मंगरुळपीर शहरात जि.प. ग्राउंड जवळ शेलुबाजार कडे जाणाऱ्या रोडवर अवैध देशी / विदेशी दारुची वाहतूक करणाऱ्या आरोपी १. विशाल श्रीराम शिवहरे २६ वर्षे रा. जयस्तंभ चौक कारंजा २. गजानन टेकराव चौकशे रा.जयस्तंभ चौक कारंजा यांचेकडून बोलेरो वाहन क्रमांक MH-४० BQ - ५७८६ सह देशी/विदेशी दारु किंम २०१२२०/- रुपये, बोलेरो वाहन व मोबाईल असा एकुण १०११२२०/- (दहा लाख अकरा हजार दोनशे विस) रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दारुचा पुरवठा करणारे १. रोहीत लुल्ला २. वैभव (काल्या) ३. अनुप ४. भोला ५. गोलु ६. तन्नु दिपक शिवहरे ७. मंगेश जाधव रा. पारवा ८. बाबु ठाकुर रा. मंगरुळपीर

दारु खरेदी करणारे १. दारासिंग राठोड रा. भडशिवणी २. गौतम रा. खडी धामणी ३. राम रा. कामरगांव ४. बाळु वैरागळे रा. खेर्डा ५. पिंटु किर्दक रा. काकडशिवणी ६. पुंडलीक पवार रा. भडशिवणी ७.प्रकाश वानखेडे रा.बांबर्डा ८. उमेश रा. मोखड पिंप्री ९. अंकुश रा. आखतवाडा १०. अतुल शिंदे रा. खेर्डा ११. उदयसिंग राठोड रा.विळेगांव १२. गुलाबराव तायडे रा. बांबर्डा १३. धिरज खराड रा. पोहा १४. संतोष रा. पोहा १५. गौतम इंगोले रा. पारवा कारंजा १६. सिध्दार्थ रा. चांधई ता. कारंजा यांचेवर पोलीस स्टेशन मंगरुळपीर येथे महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ ई सह कलम ३( ५ ) भारतीय न्यायसंहीता प्रमाणे नोंद करुन कार्यवाही केली आहे.

सदर ची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक वाशिम श्री. अनुज तारे (IPS), श्रीमती लता फड अपर पोलीस अधीक्षक वाशिम यांच्या मार्गदर्शनाने श्री. नवदीप अग्रवाल सहाय्यक पोलीस अधीक्षक उपविभाग वाशिम यांचेसह उविपोअ येथील कार्यालयीन स्टॉप सपोनि अतुल इंगोले, येथील पोहेकॉ /७४७, रविंद्र कातखेडे पोकॉ / १४६८ अनंता डौलसे, पोकॉ/ ३१६ सुमीत चव्हाण व उपविपोअ कार्यालय वाशिम येथील पोहेकॉ गणेश बाजड पोकॉ शंकर वाघमारे यांनी पार पाडली.

## अंजना स्कूल ऑफ एक्सलन्स : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचे नवे दालन!



**छत्रपती संभाजीनगर (प्रा. शिवाजी गायकवाड) :** अंजना स्कूल ऑफ एक्सलन्सने शैक्षणिक क्षेत्रात एक अद्वितीय यश संपादन केले आहे. शाळेने सलग तीन वर्षे १०० टक्के निकालाची नोंद केली आहे, आणि विशेष म्हणजे यावर्षी तब्बल ९० टक्के विद्यार्थ्यांनी ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवून शाळेच्या गुणवत्तेची पताका फडकवत ठेवली आहे.

या नेत्रदीपक कामगिरीमुळे शाळेचे सर्वत्र कौतुक होत आहे.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी अंजना स्कूल ऑफ एक्सलन्सने एक महत्वाचे पाऊल उचलले आहे. याच शैक्षणिक वर्षापासून शाळेच्या प्रांगणात कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखांचे महाविद्यालय सुरू करण्यात आले आहे. यामुळे आता ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शहरांकडे धाव घेण्याची गरज उरणार नाही.या महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांसाठी आणखी एक महत्त्वपूर्ण सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे, ती म्हणजे JEE आणि NEET सारख्या प्रतिष्ठित प्रवेश परीक्षांची तयारी. इयत्ता ११ वी आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांना आता याच ठिकाणी या स्पर्धा परीक्षांसाठी विशेष मार्गदर्शन मिळणार आहे.अंजना स्कूल ऑफ एक्सलन्स केवळ उच्च शिक्षणावरच लक्ष केंद्रित करत नाही, तर विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया भक्कम करण्यासाठी इयत्ता ५ वी पासूनच 'फाउंडेशन क्लासेस' सुरू केले आहेत.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात आणि शैक्षणिक पातळीत निश्चितच वाढ होईल, असा विश्वास शाळेने व्यक्त केला आहे.दूरदूरहून शिक्षण घेण्यासाठी इच्छुक असलेल्या परंतु चांगल्या शाळा आणि मार्गदर्शकांच्या अभावी संधी न मिळणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अंजना स्कूल ऑफ एक्सलन्सने हॉस्टेल सुविधा देखील उपलब्ध करून दिली आहे. या सुविधेमुळे विद्यार्थ्यांना एकाच ठिकाणी राहून उत्तम शिक्षण घेता येणार आहे.इयत्ता ११ वी आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी शाळेत अद्ययावत पुस्तकांनी सुसज्ज अशी मोठी लायब्ररी आणि होस्टेलची सोय करण्यात आली आहे. यामुळे विद्यार्थ्यांना वेळेचा अपव्यय न करता केवळ अभ्यासावर लक्ष केंद्रित करणे शक्य होणार आहे. शाळेतील विद्यार्थ्यांना चांगली विचारसरणी आणि ज्ञान मिळावे, यासाठी निवासी सुविधा देखील उपलब्ध आहे, जो आजच्या समाजाची गरज आहे.अंजना स्कूल ऑफ एक्सलन्सच्या व्यवस्थापनाने आगामी इयत्ता १२ वीच्या महाविद्यालयीन परीक्षेतही उत्कृष्ट निकाल देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. विद्यार्थ्यांची कठोर मेहनत आणि शिक्षकांचे समर्पित प्रयत्न यांमुळे संस्थेचे विद्यार्थी निश्चितच उज्ज्वल यश प्राप्त करतील, असा विश्वास शाळेने व्यक्त केला आहे.

अंजना स्कूल ऑफ एक्सलन्सचे हे कार्य ग्रामीण भागातील इतर शैक्षणिक संस्थांसाठी निश्चितच प्रेरणादायी आहे. दर्जेदार शिक्षण आणि सर्वोत्कृष्ट सुविधांच्या माध्यमातून ही शाळा परिसरातील विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याची शिल्पकार ठरत आहे.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २० मे २०२५


## नवजीवन ॲडव्हान्स्ड होमिओपॅथी क्लिनिक व सुरभी हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी शिबीर



**नाशिक :** जनसामान्यांच्या आरोग्याच्या हितासाठी *नवजीवन ॲडव्हान्स्ड होमिओपॅथी क्लिनिक* (अशोक मार्ग, नाशिक) आणि *सुरभी हॉस्पिटल* यांच्या संयुक्त विद्यमाने एक विशेष **मोफत आरोग्य तपासणी शिबीर** आयोजित करण्यात आले आहे. हे शिबिर **२० मे २०२५ (मंगळवार)** रोजी सकाळी **१० ते दुपारी २** या वेळेत होणार आहे.

या शिबिराचे आयोजन *प्रख्यात छातीरोगतज्ज्ञ डॉ. अनिर्बन बॅन्डोपाध्याय* (Dr. Anirban Bandopadhyay) आणि *होमिओपॅथी तज्ज्ञ डॉ. आशा भोसले-पाटील* (Dr. Asha Bhosale-Patil) यांनी केले आहे.

या दिवशी खालील **मोफत सुविधा** नागरिकांसाठी उपलब्ध असतील:

- **प्रसिद्ध छातीरोगतज्ज्ञ डॉ. अनिर्बन बॅन्डोपाध्याय यांचा मोफत वैद्यकीय सल्ला**
- **PFT टेस्ट (फुफ्फुस कार्यक्षमतेची तपासणी)**
- **ECG (हृदय तपासणी)**
- **ब्लड शुगर तपासणी**
- **होमिओपॅथिक सल्लामसलत मोफत**, तसेच *होमिओपॅथिक औषधांवर ५०% सवलत*

या उपक्रमाचा उद्देश म्हणजे नागरिकांनी विविध वैद्यकीय प्रणालींचा लाभ घेत **समग्र आणि प्रभावी आरोग्य सेवा** मिळवणे.

*डॉ. अनिर्बन बॅन्डोपाध्याय* आणि *डॉ. आशा भोसले-पाटील* यांचे म्हणणे आहे की, "आजच्या काळात **होमिओपॅथी आणि ॲलोपॅथी यांसारख्या वैद्यकीय पद्धतींचा एकत्रित उपयोग** रुग्णाच्या आरोग्याच्या दृष्टीने फारच उपयुक्त ठरतो. अचूक निदान आणि लक्षणांवरील तात्काळ नियंत्रण यासाठी ॲलोपॅथी प्रभावी आहे, तर होमिओपॅथी दीर्घकालीन बरेपण आणि प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी उपयुक्त ठरते."

हा शिबिर सर्वांसाठी खुला असून, गरजू आणि वृद्ध नागरिकांनी विशेषतः या संधीचा लाभ घ्यावा, असे आयोजकांचे आवाहन आहे.

📍 **स्थळ:** नवजीवन ॲडव्हान्स्ड होमिओपॅथी क्लिनिक, अशोक मार्ग, नाशिक

🕙 **वेळ:** सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत

📅 **दिनांक:** २० मे २०२५, मंगळवार

**तारीख लक्षात ठेवा — मोफत तपासणी आणि समग्र आरोग्य सेवेसाठी अवश्य उपस्थित राहा!**

## डॉ.सौ. इं.भा. पाठक महाविद्यालयात बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी बारावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेच्या अध्यक्षा डॉ. ॲड.कल्पलता पाटील भारस्वाडकर, सचिव ॲड.धनंजय कुलकर्णी व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई यांनी अभिनंदन केले.

तसेच आज महाविद्यालयाच्या सभागृहात विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी मंचावर प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई, पर्यवेक्षक माधुरी भावसार, डॉ. प्रभाकर गायकवाड, डॉ. रजनी सेनाड, डॉ. शोभा हनवते आदींची उपस्थिती होती.महाविद्यालयाने याही वर्षी गौरवशाली यशाची परंपरा कायम राखली आहे. महाविद्यालयाचा विज्ञान शाखेचा 91.67 टक्के, कला शाखेचा 79.60 टक्के, वाणिज्य शाखेचा 81.48 टक्के, एच एस व्ही सी 71.42 टक्के निकाल लागला आहे.

महाविद्यालयातुन शाखा निहाय प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थी अनुक्रमे कला शाखा- कु.भार्गवी मोदी ९३.८३, कु.राधिका दैठणकर ८७.१७, कु.अमृता गायके ८०.३३, वाणिज्य शाखा- कु. निदा फिरदौस पटेल ९४.६७, कु.वर्षा शर्मा ८७.८३, कु.तोसामा सोनिया ८६.००, विज्ञान शाखा- कु.विद्या गादिया 88.50, कु, मैथिली भालगावकर ७२.१७ , जिवेश यादव, एच. एस. व्ही.सी. - कु. हजॉ ग रिया ज्योती- ७६.८३, कु.अग्रवाल प्रियानी ७५.८३, कु.पाखरे अनिता ६८.००, कु. गाडेकर पूजा तसेच ६८.०० तसेच उन्नती उमरकर, भार्गवी मोदी,अर्पिता कदम, राधिका दैठणकर, हर्षराज परसोडे, ईश्वरी खेळवणे या विद्यार्थ्यांनी संस्कृत विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत. यावेळी महाविद्यालयातून विषय निहाय सर्व प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचाही स्मृती चिन्ह व बुके देऊन महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई व विषय शिक्षकांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी पर्यवेक्षिका प्रा.माधुरी भावसार, डॉ. शोभा हनवते, डॉ. प्रभाकर गायकवाड, प्रा.मंगल मोरे, डॉ शीला जिरे,प्रा.रवींद्र परभाणे, डॉ . रजनी सेनाड, प्रा.सिद्धार्थ शिंदे, प्रा.शंकर विधाते, प्रा.ज्योती मंठाळकर, प्रा.ज्योत्स्ना लचूरे,प्रा.नीता गोरे, प्रा.जयश्री वाघमारे इत्यादींची उपस्थिती होती. तसेच पालक व वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यावेळी उपस्थित होते.




महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २० मे २०२५

# उच्च न्यायालयात एस इ बी सी कायद्याला आव्हान - डॉ.राजेंद्र दाते पाटील यांची माहिती



**मुंबई :** महाराष्ट्रातील सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक प्रवेशांमध्ये १०% मराठा आरक्षणाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सुनावणी करण्यास सर्वोच्च न्यायालयाने अलिकडेच नकार दिला. सरन्यायाधीश बी.आर. गवई आणि न्यायमूर्ती ए.जी. मसीह यांच्या खंडपीठाने नीट यूजी आणि नीट पीजी २०२५ परीक्षांची तयारी करणाऱ्या उमेदवारांनी दाखल केलेल्या दिया रमेश राठी यांची मराठा आरक्षण विरोधी याचिका निकाली निघाली असुन सदर याचिकेवर सुनावणी करण्यास नकार दिला असल्याचे पुढे आले असल्याची माहिती उच्च न्यायालयातील मुख्य हस्तक्षेप याचिकाकर्ता जेष्ठ अभ्यासक डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी दिली आहे.

सर्वोच्च न्यायालयात क्युरेटीव्ह प्रलंबीत तर उच्च न्यायालयात एस इ बी सी कायद्याला आव्हान राज्य शासनास घटनात्मक बुद्धी चातुर्य पणाला लावावे लागेल अशी महत्वाची प्रतिक्रिया जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी आमच्या प्रतिनिधी सोबत बोलतांना दिली असून सर्वोच्च न्यायालयात क्युरेटीव्ह पीटिशन जी मागील एस इ बी सी कायदा रद्द बातल केल्याच्या निर्णय विरुद्ध सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे तर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशा नुसार मागास वर्ग आयोग स्थापन करून मराठा समाजाचे सामाजीक व शैक्षणिक मागास पण नव्याने तपासून ओबीसी आयोगाचा आरक्षण देण्याची शिफारस व त्या आधारे राज्य शासनाने कायदा पारित करीत दिलेले आरक्षण उच्च न्यायालयात या कायद्याला आव्हान दिलेले आहे.

क्युरेटीव्ह पीटिशन मंजुर झाली तर नव्या कायद्याने दिलेले आरक्षणाचे काय ? मुंबई उच्च न्यायालयाने आलेल्या आदेशा प्रमाणे स्वतंत्र बेंच स्थापन झाल्यावर दैनंदिन सुनावणी घेतली तर परत ५० टक्के मर्यादा आडवी येईल व हा कायदा परत रद्द बातल झाला तर शासन मराठा समाजाला न्याय कसा देणार ? हा अत्यंत महत्वाचा प्रश्न जेष्ठ अभ्यासक व मुख्य हस्तक्षेप याचिकाकर्ता डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी मांडला आहे.राज्य शासनास या पूर्वीच्या अहवालांचे विश्लेषण करणे अत्यावश्यक असल्याचे ते म्हणाले अलीकडील रिग्रेशन प्रतिगमना च्या संदर्भात शैक्षणिक मागासलेपणाचे पुनर्परीक्षण करणे सुध्दा आवश्यक असुन मराठ्यांच्या अलीकडच्या रिग्रेशन प्रतिगमनाच्या संदर्भात सामाजिक मागासलेपणाचे पुनर्परीक्षण करणे सुध्दा आवश्यक बाब ठरणार असुन नेमके हेच निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने केलेले आहे हे विशेष होयसविस्तर बाब अशी आहे की,परीक्षांची जवळ आलेली तारीख लक्षात घेता(नीट पी. जी.साठी १५ जून, नीट यूजी ४ मे रोजी घेण्यात आली होती), यात सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाला अंतरिम दिलासा मिळण्याची शक्यता विचारात घेण्यास सांगितले.

उल्लेखनीय म्हणजे, मुंबई उच्च न्यायालय सध्या महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गीय आरक्षण कायदा,२०२४ विरुद्ध अनेक याचिकांनी व्यापलेले आहे, जो मराठा समाजाला नोकऱ्या आणि शिक्षणात १०% आरक्षण देतो.या बाबत मराठा आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक डॉ.राजेंद्र दाते पाटील यांची मुख्य हस्तक्षेप याचिका दाखल आहे.या मध्ये अनेक याचिकाकर्त्यांनी महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय आरक्षण कायदा, २०२४ ला आव्हान दिले आहे आणि या कायद्याला अंतरिम स्थगिती देण्याची मागणी केली आहे. मराठा आरक्षण कोटा म्हणजे नक्की काय? न्यायाधीश (निवृत्त) सुनील बी. शुक्रे यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग च्या अहवालाच्या आधारे राज्य सरकारने कायदा २० फेब्रुवारी २०२४ रोजी विधिमंडळात मंजूर केला आणि २६ फेब्रुवारी २०२४ रोजी अधिसूचित केला.

अहवालात राज्यातील एकूण आरक्षण मर्यादेपेक्षा जास्त असलेल्या मराठा समाजाला आरक्षण देण्याचे औचित्य म्हणून "अपवादात्मक परिस्थिती आणि असाधारण परिस्थिती " उद्धृत करण्यात आली आहे.देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वा खालील सरकारने २०१८ मध्ये लागू केलेल्या महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गीय आरक्षण (एस इ बी सी)कायदा, २०१८ ला आव्हान देण्यासाठी एका वकिलाने यापूर्वी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. या कायद्याने मराठ्यांना सरकारी नोकऱ्या आणि शिक्षणात १६ टक्के आरक्षण दिले होते.जून २०१९ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने २०१८ चा कायदा कायम ठेवला,परंतु १६ टक्के कोटा अन्याय्य मानला आणि तो शिक्षणात १२ टक्के आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये १३ टक्के केला.

मे२०२१ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या घटना पीठाने एस इ बी सी कायदा,२०१८ रद्द बातल ठरवत म्हटले की, कोणत्याही असाधारण परिस्थितीत मराठ्यां साठी स्वतंत्र आरक्षणाला समर्थन दिले जात नाही, जे १९९२ च्या इंद्रा साहनी निकालाने अनिवार्य केलेल्या ५० टक्के कमाल मर्यादेपेक्षा जास्त होते. सर्वोच्च न्यायालयाने मराठ्यांचे सामाजिक मागासलेपण स्थापित करण्यासाठी सादर केलेल्या अनुभवजन्य डेटावर ही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. महाराष्ट्र सरकारने पुनर्विचार याचिका दाखल केली,जी की,एप्रिल २०२३ मध्ये फेटाळण्यात आली. त्यानंतर एक क्युरेटिव्ह याचिका दाखल करण्यात आली,जी सध्या सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. जलद सुनावणीसाठी नवीन खंडपीठ स्थापन करण्याचे सर्वोच्च न्यायालयाने आदेश सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी पहिल्याच दिवशी महत्त्व पूर्ण आदेश दिले. त्यामुळे या प्रकरणी आता हालचाली वाढल्या आहेत.

मराठा आरक्षण संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना याचिकांवर जलद सुनावणीसाठी नवीन खंडपीठ स्थापन करण्याचे निर्देश दिले. सरन्यायाधीश बी.आर. गवई यांच्या पहिल्याच कामकाजाच्या दिवशी हा महत्त्वपूर्ण आदेश दिला. सरन्यायाधीश बी.आर.गवई आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या द्विपीठा समोर ही सुनावणी झाली. सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गीय एस इ बी सी प्रवर्गा अंतर्गत वैद्यकीय प्रवेशासाठी मराठा विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या १० टक्के आरक्षणाला आव्हान देण्यात आलेल्या याचिकांवर तत्काळ नवीन खंडपीठ स्थापन करून जलद निर्णय घेण्याचे निर्देश सुप्रीम कोर्टाने मुंबई उच्च न्यायालयाला दिले आहेत.याच सर्व पांच प्रकरणात नेमकी आणि सुस्पष्ट हस्तक्षेप याचिका फार पूर्वीच जेष्ठ अभ्यासक डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी दाखल केलेली असुन ही कायदेशीर रित्या अत्यंत महत्वाची बाब ठरली आहे.

उच्च न्यायालयात याचिकांवर सुनावणी न झाल्याने प्रकरण सुप्रीम कोर्टात या वर्षी जानेवारी मध्ये तत्कालीन मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश देवेंद्र कुमार उपाध्याय यांची दिल्ली उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून बदली झाल्यानंतर याचिकांवर सुनावणी झाली नाही. त्या विरोधात याचिकाकर्ते दिया रमेश राठी व इतर सुप्रीम कोर्टात पोहचले. सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना मराठा आरक्षण देणाऱ्या कायद्याच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर जलद सुनावणी करण्यासाठी नवीन खंडपीठ स्थापन करण्याचे निर्देश दिले.या वर्षी जानेवारी मध्ये तत्कालीन मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश देवेंद्र कुमार उपाध्याय यांची दिल्ली उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून बदली झाल्या नंतर याचिकांवर सुनावणीझाली नाही. न्यायमूर्ती उपाध्याय हे पूर्ण किंवा तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाचा भाग होते जे गेल्या वर्षी एप्रिलपासून सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय (एस इ बी सी ) कायदा, २०२४ विरुद्धच्या याचिकांवर सुनावणी करत होते.

आगामी शैक्षणिक सत्रा मुळे निर्माण झालेली निकड आणि मुंबई उच्च न्यायालया कडून निर्णय घेण्यास होणारा विलंब याकडे याचिकाकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालाचे लक्ष वेधले. वैद्यकीय प्रवेशासाठी उशीर होण्याची शक्यता सुनावणी वेळी अधोरेखीत करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाला योग्य ते निर्देश देण्याची विनंती करण्यात आली होती.याचिका कर्त्यांचा युक्तिवाद १४ऑक्टोबर २०२४ रोजी संपला होता. महाराष्ट्राच्या लोकसंख्येच्या जवळजवळ एक तृतीयांश लोकसंख्या असलेल्या मराठा समाजाला शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये १० टक्के आरक्षण देणारा २०२४ चा कायदा गेल्या वर्षी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकां दरम्यान राजकीय चर्चेत आघाडीवर होता असे ही शेवटी जेष्ठ अभ्यासक आणि उच्च न्यायालयातील मुख्य हस्तक्षेप याचिका कर्ता डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी नमुद केले.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

**महाराष्ट्र जनशक्ती**
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २० मे २०२५

# शेतकरी समाजाला नवे आत्मभानद्यावे लागेल !



शेती आणि शेतकरी हा केवळ चिंतेचाच नव्हे तर चिंतनाचा विषय झाला आहे. शेतकरी ही केवळ एक विशिष्ठ जात समुह नाही तर सर्वच समाजघटकात शेतकरी समाज आहे. जो प्रत्यक्ष शेती कसून त्यावर आपली व आपल्या कुटूंबांची गुजराण करतो तो शेतकरी. अशी शेतकरी समाजाची व्याख्या करावी लागेल. केवळ नावावर सातबारा आहे म्हणून तो शेतकरी होत नाही. कोण असतो भूमिपुत्र ? या कवितेत मी यापूर्वी वेदनांचा गाव या माझ्या कवितासंग्रहात शेतकऱ्यांची व्याख्या विविध संकल्पनासह स्पष्ट केली आहे.

आजपर्यंत शेती व शेतकऱ्या विषयी बरेच लिहून झाले आहे. यापुढेही विपूल लिहिले जाईलच. तरीही शेतकरी समाजांचे जीवन आहे तसेच आहे. शेतकऱ्याच्या वाटयाला कायम पिढ्यान पिढ्याचे दु:खभोग आलेलेच आहेत. त्यात काही अमुलाग्र बदल होईल असे आपणास आता तरी सुतराम वाटत नाही. तो सर्वच बाजूने शोषणाच्या विळख्यात व अस्मानी सुलतानी संकटाच्या जोखडात अडकत चालला आहे. शेतकरी हा वर्तमान काळात चेस्टेचा टिंगल टवाळीचा विषय झाला आहे. शेतकऱ्यांना सर्वच लुटायला निघाले आहेत. शेतकऱ्याना एकच एक शत्रू नाही. सबंध व्यवस्थाच त्याच्या विरोधी आहे. आपले कोण ? व परके कोण ? हे त्याला सांगता येत नाही. एक ना अनेक प्रश्नांचा पाढा त्याच्या समोर आ वासून उभा आहे. भाऊबंदकी हा त्याच्या जीवनाला लागलेला फार मोठा कलंक आहे. आपल्याच रक्ता मासाचे लोक आपल्याच जीवावर उठतात.

आपले भले होवू नये यासाठी देव पाण्यात ठेवून बसतात. प्रत्येक क्षणी ही भाऊबंद मंडळी त्याची अडवणूक छळवणूक आणि शक्य ती लुबाडणूक करण्याचे प्रयत्न करीत असतात. वरवर केवळ खोटी सहानुभूती दाखवायची आणि त्याला नेहमी पाण्यात पहायचे हे चित्र सार्वत्रिक आहे. भाऊबंदकीला ग्रामराज कारणाची फोडणी देवून हे गावकारभारी त्यांच्यात ऊभी फूट पाडतात. त्यांच्या छोट्या मोठ्या कुरबुरीचा फायदा घेवून त्यांच्यात दुही निर्माण करतात. भाऊबंदकी बरोबरच वाटणी हा देखील शेतकऱ्याच्या जीवनात येणारा महाभयानक प्रसंग आहे. भाऊ भाऊ लग्न होई पर्यंत एकत्र राहतात, लहाण्याचे लग्न झाले की वेगळं निघण्याच्या हालचाली सुरू होतात. त्याचे तंत्रही निरनिराळे वापरतात. ग्रामीण भागात हे सर्रास पहावयास व अनुभवावयास मिळते. वाटणी करतांनाही भेदभाव केले जातात. काहींना हलक्या जमिनी माथी मारून त्यांची बोळवण केली जाते. या प्रक्रियेत गावकारभारी हातमारून घेतात. शेतकऱ्यांच्या वाट्याला कायमच उपेक्षेचे जीणे आले आहे.

पीकवण्याच्या नादात व आम्ही केवळ मालक आहोत या भूमिकेने आणि त्याला कायम भावनिकतेत गुरफटून ठेवल्यामुळे त्याला व्यावहारिक होऊ दिले नाही. उलटपक्षी बळिराजा, मालक, जगाचा पोशिंदा अशी विशेषणे लावून त्याचा अहंकार कुरवाळला गेला. त्यामुळे तो स्वत:ला पुर्णपणे व्यावहारिक बनू शकला नाही. विकेल ते पिकेल हे शहाणपणाचे सूत्र व्यवस्थेने त्याला जमू दिले नाही. त्यामुळे मातीत घाम गाळणारा कष्ट करणारा भिकारी झाला आणि विकणारी लखोपती झाले. पिकवण्यापेक्षा आता विकण्याचे तंत्र त्याला आत्मसात करावे लागतील. शासन, प्रशासन, नोकरदार, कर्मचारी, अधिकारी , नेते एकमेकांशी संगनमत करून त्याची चोहो बाजूनी आर्थिक व सामाजिक कोंडी करतात. त्यामुळे शेतकऱ्यांना या व्यवस्थेत न्याय मिळत नाही. शेती मातीसह साराच गावगाडा अस्वस्थ आहे. बी बीयाणे, खते व कीडनाशके बनावट प्रतिची त्याच्या माथी मारली जातात. त्यातून भरमसाट पैसा कमवला जातो. शेवटी मरतो तो फक्त शेतकरीच. आज गावाकडे शेती करणे असह्य झाले आहे.

बहुतांश शेतकऱ्यांनी आपल्या शेत्या पडिक ठेवल्या किंवा ठोक्याने व वाटयाणे कसायला दिल्या. शेती करणारी आता शेवटची पीढी आहे तिही थकली आहे. घरातील तरुण पिढी शिक्षण , नोकरी व व्यवसाया निमित्ताने शहरात गेली. त्यामुळे घरचे काम करणारे राहिले नाही. गावाशिवारात मजूर मिळत नाही. मजुरी करणे आताच्या पिढीला कमीपणाचे वाटू लागले आहे. त्यामुळे शेती व्यवसाया समोरील मजुरांचे फार मोठे आव्हान ऊभे राहिले आहे. बाहेरगावाहून मजूर आणावे लागतात. त्यांची जाण्या येण्याची खाण्या पिण्याची व्यवस्था करावी लागते. मजुरीचे दरही भरमसाट वाढले आहे. सर्वच कामेही आता ट्रॅक्टरने केली जातात. महागडे बीयाणे, खते औषधे, आणि मजुरीची वारेमाप खर्च यामुळे शेतकरी अडचणीत सापडले आहे. पारंपारिक पीके घेवून जमिनी नापिक बनल्या आहेत. जमिनीचे प्रचंड शोषण होत आहे. अतिशय महागडी कीटक नाशाक व खते वापरून जमिनीचे आरोग्य धोक्यात आले आहे.

घरी बैल बारदाना, शेळ्या काहीच नाही. त्यामुळे फक्त नामधारी शेतकरी उरले आहे. त्यातच सर्व शेतीची कामे शाळकरी मुले, मुली आणि महिलांच्या माथी मारली जातात. हे अर्धवट शेतकरी पुढाऱ्यांच्या मागे फिरण्यात हयात घालवतात. शेवटी वाटयाला वंचनेशिवाय काहीच मिळत नाही. शेतकऱ्यांच्या मुलांना उच्च गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण पैशा अभावी घेता येत नाही. छोट्या मोठ्या गोस्टीवर त्यांना समाधान मानावे लागते. या जीवघेण्या स्पर्धेत भांडवली व्यवस्थेत शेतकऱ्यांची मुले कशी टिकतील हा खरा प्रश्न आहे. शेतकऱ्यांच्या जीवावर राजकारण करून मोठे होतात मात्र त्याच्या न्याय हक्कासाठी लढायला कुणी पुढे येत नाही. उलट सर्वांनीच शेतकरी समाजाचा प्रचंड वापर करुन घेतला आहे. त्याला खोटी आश्वासने देवून कायम त्याची फसवणूक करण्याचे पातक इथल्या प्रस्थापित व्यवस्थेने केले आहे. आज सत्तेत असाणारे ही शेतकऱ्यांचीच मुले आहेत.

त्यांनी आपल्या बांधवाकडे पाठ फिरवून त्याला कायम गुलाम केले आहे. बेभरवशाची शेती, अवकाळी विळखा, गारपीट आणि प्रचंड महागाई यामुळे तो प्रचंड मेटाकुटीला आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पोरांची लग्ने होत नाही. प्रत्येक गावात पाच पन्नास नवरदेव सापडतीलच. त्यांना कुणीही मुली देत नाही. हा नवाच पेचप्रसंग अन नवा प्रश्न शेतकरी समाजापुढे निर्माण झाला आहे. शेतकऱ्यांना जातीच्या दृष्ट चक्रात अडकवूण शेतकरी असण्याऐवजी त्यांना जाती जातीत जातीय अस्मितेत बंदिस्त केले गेले. तोही या खोट्या प्रतिष्ठेत व जातीय अस्मितेत एवढा गुरफटला की त्यातून त्यांना बाहेर काढणे सशक्य आहे असे आजचे वास्तव पाहून वाटते. जाती जातीच्या लढाईत त्याला गुरफटत ठेवून त्याच्या मुळ प्रश्ना विषयी त्याला जाणिवच होवू दिली जात नाही. शेतकरी म्हणून तो एकत्र आला तर व्यवस्थेला त्याची दखल घेणे भाग पडेल. जातीच्या वोट बँका तयार झाल्या मात्र शेतकऱ्यांची वोट बँक अद्याप ही तयार झाली नाही. पुढेही होईल की नाही सांगता येणार नाही. हे असेच राहिले तर त्याचे जगणे भयावह होईल. खोटया प्रतिष्ठा मानपान व लग्न कार्यादी प्रसंगी अवाढव्य खर्च. यामुळे तो कर्जाच्या विळख्यात भरडला जात आहे.

आपल्या हाताने आपल्या मरणाला कारणीभूत ठरत आहे. त्यात शेतकरी विरोधी अमानुष कायदे आणि शासनाचे उदासिन धोरण यामुळे शेतकरी आत्महत्येचे सत्र वाढतच आहे. विशेषत: मराठवाडा व विदर्भ मृसणखाया तयार करीत आहेत. आपण जागे कधी होणार ? या दुष्ट चक्रातून सावरायचे असेल तर रडण्यापेक्षा त्याला आता आपल्या न्याय हक्कासाठी लढावेच लागेल. त्यासाठी जातीय अस्मितेतून खोट्या प्रतिष्ठेतून त्याला बाहेर काढून शेतकरी म्हणून संघर्ष करावाच लागेल. संघर्षा शिवाय त्याच्या वाटयाला काहीच येणार नाही. आता शेतकऱ्यांच्या अस्तित्वाची लढाई सुरू आहे. त्याला या व्यवस्थेत टिकावयाचे असेल तर संघर्षा शिवाय पर्याय नाही.प्रसंगी आपल्याच माणसा विरुद्ध ही दोन हात करावेच लागतील. स्वाभिमानशून्य व अस्तित्व हिन बनलेल्या शेतकऱ्यांना आता नवे आत्मभान द्यावेच लागेल. या न्याय हक्काच्या लढाईत किसान पूत्रांनाही उतरावे लागेल. सरकारे येतील जातील मात्र मायबापांच्या घामाच्या दामाची लढाई लढवावीच लागेल.

त्यासाठी बांधा बांधावर जावून क्रांतीचं, नव्या लढ्याचं नवं तंत्र त्यांना नव्या भानासह सांगावे लागेल, तरच तो या व्यवस्थेला खडबडून जागे करील. त्यासाठी शेतकरी म्हणूनच सर्वांना एकत्र यावे लागेल. -



**प्रा. डॉ. शिवाजी हुसे,**
**कन्नड**
**९४०४० ००३९८**